# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २०६ वा बुधवार दि.०५ फेब्रुवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## गळती रोखण्याच्या कामांसाठी ३१५ कोटी ५ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता

मुंबई : पुणे जिल्ह्यातील टेमघर प्रकल्पाचे (ता. मुळशी) मजबुतीकरण व गळती रोखण्याच्या कामांकरिता ३१५ कोटी ५ लाख रूपयांच्या खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

टेमघर धरणातून पुणे शहराला दरवर्षी ३.४०९ अघफू पाणी पिण्यासाठी उपलब्ध केले जाते. तसेच मुळशी तालुक्यातील कोल्हापूर पद्धतीच्या बंधा-याद्वारे १ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. हा प्रकल्प पुणे शहराच्या वरच्या बाजूस आहे. या प्रकल्पाला गळती लागल्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. यामुळे धरणाच्या तसेच पुणे शहराच्या सुरक्षिततेचा




गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. तसा अहवाल विविध समित्यांनी दिला आहे.

त्यांच्या शिफारशींचा विचार करता धरणाची गळती रोखण्यासाठी तातडीने उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे. हे काम केल्याने गळती थांबणार असून त्यामुळे शेतक-यांना सिंचनासाठीही पाणी उपलब्ध होणार आहे. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता आज झालेल्या बैठकीत मंत्रिमंडळाने टेमघर प्रकल्पाच्या गळती रोखण्यासाठीच्या उपाययोजना व धरण मजबुतीकरण कामासाठी ३१५ कोटी ५ लाख रुपयांच्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली.

## महाराष्ट्र केसरीच्या दोन्ही गदा परत करणार

सांगली : या वर्षीच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धा अहिल्यानगरमध्ये पार पडल्या. कुस्ती स्पर्धेतील पंचांच्या निर्णय वादावरून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटलांनी आता आपला महाराष्ट्र केसरीच्या दोन्ही गदा परत देण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

दरम्यान, पैलवान शिवराज राक्षे विरुद्ध पै. पृथ्वीराज मोहोळ यांच्यात मॅटवरील सेमीफायनल मॅच झाली, यावेळी शेवटच्या क्षणी मोहोळ याला विजयी घोषित केले. यावेळी पंचांच्या निर्णयावर आक्षेप नोंदवला. यावरुन या स्पर्धेत वाद वाढला. राज्यभरातून या स्पर्धेवर प्रतिक्रिया येत आहेत आता डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी मोठा निर्णय घेतला आहे.

पंचांच्या निर्णयामुळे आपल्याला पराभवाला समोर जावं लागलं,त्यामुळे पंच कमिटीने माझ्या पराभवाच्या गोष्टी मान्य केल्या,तर त्याचं मला समाधान वाटेल नसेल तर मी माझ्या डबल महाराष्ट्र केसरीच्या दोन्ही गदा,येत्या २ दिवसात कुस्तीगिरी परिषदेला परत देणार असल्याचं पै. चंद्रहार पाटील यांनी जाहीर केले आहे.

शिवराज राक्षे याला पंचांच्या लाथ मारण्याच्या घटनेवरून पंचाला गोळ्या खायला पाहिजे होतं,असं वादग्रस्त विधान केलं होतं. त्यानंतर आता पंच निर्णयावरून चंद्रहार पाटलांनी आक्रमक



भूमिका घेतली आहे.

एका डिबेट कार्यक्रमामध्ये काका पवार, संदीप भोंडवे आणि शिवराज राक्षे होते, यावेळी २००९ ला माझा महाराष्ट्र केसरी स्पर्धेला सर्व पंच कमिटीने पराभव केला याबद्दल काका पवारांना विचारल्यावर त्यांनी मान्य केले की चंद्रहारवर अन्याय झाला. शिवराज राक्षे हा त्यांचा पठ्ठा, त्याच्यावर अन्याय झाला की ते माध्यमांना सांगत आहेत. पण जेव्हा माझ्या बाबतीत हे घडत असताना तुम्ही तिथे हजर होते.

शरद पवार साहेब हे कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष होते. मला हरवल्यानंतर मी आत्महत्येच्या विचारात होतो. आजही मी कोणत्या कुस्तीच्या मैदानामध्ये जात नाही, कारण माझ्या मनामध्ये भीती बसली आहे. एखाद्या पैलवानाची अशी परिस्थिती का होते? असा सवाल करत आपल्या मनातील खदखद चंद्रहार पाटलांनी बोलून दाखवली आहे.

शिवराज राक्षेवर ही परिस्थिती आल्यावर काका पवारांना याचे दु:ख कळाले. आज त्यांनी मान्य केले की माझ्यावर अन्याय झाला होता. तशाच पद्धतीने त्यावेळच्या कुस्तीगीर परिषदेने मान्य करावे की चंद्रहारवर अन्याय झाला आणि त्यावेळेस त्याला हरवण्यात आले.

म्हणजे माझ्या मनाला कुठेतरी समाधान होईल नाहीतर मला या दोन्ही महाराष्ट्र केसरीच्या गदांची गरज नाही. मी जे आजपर्यंत केलं ते प्रामाणिकपणे करून या पदापर्यंत पोहोचलो होतो. अन्याय होऊन मी एखाद्या विशिष्ट विचारापर्यंत गेलो होतो. आयुष्यभर जिवंत आहे तोपर्यंत कुस्तीची सेवा करणार असल्याचे चंद्रहार पाटील यांनी म्हटले आहे.

## महाबळेश्वर, कोयना जलाशयातील बुडीत बंधारे बांधण्यासाठी १७० कोटी रूपयांची तरतूद

मुंबई : सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर व जावळी तालुक्यातील कोयना जलाशयामध्ये बुडीत होणारे २५ बंधारे बांधण्यासाठी १७० कोटी रूपयांची तरतूद करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.



कोयना जलाशय परिसरातील हे २५ बंधारे बुडीत क्षेत्रात येतात. या जलाशयाची पाणी पातळी फेब्रुवारी ते मे या महिन्यांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात कमी होते. त्यामुळे या परिसरातील स्थानिक रहिवाश्यांना पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याची समस्या भेडसावते. ही समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना म्हणून या बंधा-यांचे बांधकाम करण्यात येणार आहे. त्यासाठी या बंधा-यांच्या बांधकामांसाठी १७० कोटी रुपयांची तरतूद करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली.

## ट्रम्प यांनी निर्णय फिरवल्याने भारतीय शेअर बाजारात उसळी

मुंबई : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगाला धाक दाखवण्याच्या नादात स्वत:चे नुकसान करून घेतले आहे. ट्रम्प यांनी अलीकडेच काही देशांवर आयात शुल्क लादण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाचा जगभर प्रभाव पाहायला मिळला. स्वत: अमेरिकन नागरिक या निर्णयावर नाराज आहेत. यानंतर ट्रम्प यांनी हा निर्णय ३० दिवसांसाठी पुढे ढकलला आहे. यानंतर भारतीय शेअर बाजाराने मंगळवारी जोरदार उसळी घेतली.



बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज बेंचमार्क सेन्सेक्स १३९७०.०७ अंकांनी उसळी घेऊन ७८,५८३.८१ वर बंद झाला. त्याचप्रमाणे नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी ३७८.२ अंकांनी वाढून २३,७३९.२५ वर बंद झाला. वास्तविक, बाजाराने मोठी झेप घेऊनही, सेन्सेक्स आणि निफ्टी अजूनही त्यांच्या विक्रमी उच्च पातळीपेक्षा ११ टक्के खाली आहेत. चीनवर अद्याप आयात शुल्क असून ते लवकरच लागू होणार आहेत. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक प्रत्येकी १% वाढल्याने मिडकॅप आणि स्मॉलकॅप समभागांमध्येही वाढ झाली.

जवळपास गेल्या महिन्यापासून अस्थीर असलेल्या शेअर बाजारातगुंतवणूकदारांना आज मोठा दिलासा मिळाला. बीएसई लिस्टेड कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल मागील सत्रातील ४१९.५ लाख कोटींवरून ४२५ लाख कोटी रुपयांवर पोहचले आहे. यातून गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ५.५ लाख कोटी रुपयांची भर पडली आहे.

### आरबीआयच्या धोरणात्मक निर्णयांवर लक्ष

अमेरिकेने कॅनडा आणि मेक्सिकोवरील नियोजित टॅरिफला स्थगिती दिल्यानंतर बाजार सुमारे २ टक्के वाढीसह बंद झाला. यामुळे वाढत्या व्यापार तणावापासून तात्पुरता दिलासा मिळाला. ४ फेब्रुवारी रोजी बाजार भांडवलात जोरदार वाढ झाली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भूमिकेमुळे जागतिक बाजारपेठा अस्थिर आहेत. अशात आता बाजारातील तज्ज्ञांचे लक्ष आरबीआयच्या ७ फेब्रुवारीच्या धोरणात्मक निर्णयावर आहे.

### या शेअर्समध्ये चढाओढ

सेन्सेक्समध्ये लार्सन अँड टुब्रो ४.७६%, इंडसइंड बँक ३.५०%, टाटा मोटर्स ३.३८%, रिलायन्स इंडस्ट्रीज ३.२८% आणि अल्ट्राटेक सिमेंट २.७८% सर्वाधिक वाढले. दुसरीकडे सर्वाधिक कोसळणा-या शेअर्समध्ये नेस्ले इंडिया ८.८१%, मारुती सुझुकी इंडिया ०.२३%, टेक महिंद्रा ०.११%, हिंदुस्तान युनिलिव्हर ०.०६% यांचा समावेश आहे.

## टोळीचा म्होरक्या धनंजय मुंडेच

छत्रपती संभाजीनगर : अजूनही टोळी सापडत नाही. गेल्या दोन वर्षाचे सीडीआर निघाले पाहिजेत. म्हणजे टोळी कोण चालवत होते, हे समोर येईल. जात आणि बीड जिल्हा बदनाम झाला आहे. धनंजय मुंडे यांनी आतापर्यंत गुंडगिरीला पाठबळ आणि साथ दिली. कारण हेच टोळी चालवत होते. बाकीच्यांना पुढे घालण्यात आले, मात्र टोळीचा म्होरक्या हाच आहे. भविष्यात पुरावे नष्ट झाले तर याला जबाबदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार राहतील, असा इशारा यावेळी मनोज जरांगे यांनी दिला आहे.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. चो-या दरोडे टाकणारे धनंजय मुंडे यांच्या जवळचे आहेत. धनंजय मुंडे या षडयंत्रामध्ये सहभागी आहेत, आम्हाला याची १०० टक्के खात्री आहे. मराठ्यांची गरज संपली, आता पुरावे नष्ट केले जाऊ शकतात, सिडीआर तपासले तर त्यांचे संबंध उघड होतील असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

ज्या मराठा समाजाने मदत केली आहे असे धनंजय मुंडे म्हणतात, आता त्या समाजाशीच ते गद्दारी करत आहेत. आता मराठ्यांची गरज संपली, त्यावेळी मराठ्यांची गरज होती, ते खोट बोलणारच, पण पाप जास्त दिवस झाकत नसते. टोळी आतमध्ये जाणार म्हणजे जाणारच. मात्र यांनी जर पुरावे नष्ट केले तर याला पूर्णपणे जबाबदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे असतील असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की,

धनंजय मुंडे गुंडगिरी थांबवत नाही, मी त्यांना कितीतरी वेळा सांगितले टोळी थांबवा, यामुळे तुमचे आणि समाजाचे वाटोळ होईल. पण त्यांना भान राहिले नाही. त्यांना वाटते टोळी मारा-मा-या, भांडण करून आपल्याला पैसे आणून देईल. पण त्यांना हे कळत नाही की यामुळे बीड जिल्ह्याचे किती नुकसान झाले आहे. धनंजय मुंडे हे अजूनही मग्रुरीमध्ये वागत आहेत असेही यावेळी जरांगे यांनी म्हटले आहे.

## संत गोपाळ बुवा साखर कारखान्याचे मान्यवरांच्या हस्ते बॉयलर अग्नी प्रदीपन उसाचे वजन, रास्त भाव आणि शेतकऱ्याचा स्वाभिमान

लातूर : – आपल्या हक्काचा साखर कारखाना व्हावा हे असंख्य शेतकऱ्यांनी पाहिलेले स्वप्न श्री संत गोपाळबुवा महाराज शुगर मिल्स या साखर कारखान्याच्या माध्यमातून प्रत्यक्षात उतरत आहे. शेतकरी हीच जात आणि हाच धर्म समजून उसाचे अचूक वजन, इतरांच्या बरोबरीने रास्त भाव आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा सन्मानाची निश्चितपणे काळजी घेतली जाईल अशी हमी कारखान्याची चेअरमन राजेश कराड यांनी बॉयलर अग्नी प्रदीपन कार्यक्रमात बोलताना दिली.

लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर परिसरात शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी उभा राहत असलेल्या संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. या साखर कारखान्याचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा मंगळवार ०४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता अध्यात्मिक क्षेत्रातील परमपूज्य विद्यानंद सागर महाराज गातेगाव, हभप नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरी, हभप लालासाहेब नाना पवार, हभप बाबा महाराज बोराडे आणि जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष नाथसिंह देशमुख यांच्यासह अनेक मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. तत्पूर्वी श्री. व सौ. सौरभ कराड आणि श्री. व सौ. ऋषिकेश कराड यांच्या शुभहस्ते विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तुळशीरामअण्णा कराड, बालासाहेबतात्या कराड, चेअरमन राजेश कराड, तेजस कराड यांच्यासह विविध पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कारखान्याचे भागधारक, ऊस उत्पादक, शेतकरी, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आज बॉयलर अग्नी प्रदीपन करण्यात आले. पंधरा दिवसात प्रत्यक्ष गाळप सुरू करून मिळेल तेवढ्या उसाचे गाळप करून कोणत्याही परिस्थितीत चाचणी (ट्रायल) घेणार आहे मात्र पुढच्या वर्षी विजयादशमीच्या दिवशी पूर्ण क्षमतेने आणि ताकतीने गळीत हंगाम सुरू करण्यात येईल असे सांगून यावेळी बोलताना चेअरमन राजेश कराड म्हणाले की, प्रयागअक्का यांच्या त्यागातून आणि समर्पणातून उभे राहिलेल्या कराड कुटुंबातील विश्वधर्मी डॉ. वि. दा. कराड अण्णाभाऊ, आमदार रमेशआप्पा यांच्या आशीर्वादातून संत गोपाळ बुवा कारखान्याची उभारणी झाली असून निश्चितपणे यशस्वी वाटचाल करील. हा कारखाना जरी छोटा असला तरी वंचित आणि दबलेल्या श `तकऱ्याचा स्वाभिमान जिवंत करण्यापूरता निश्चितपणे ताकद आहे. शेतकऱ्यांनी कराड कुटुंबावर जो विश्वास दाखवला त्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही आणि स्वाभिमानाला धक्का लागू देणार असे बोलून दाखविले.

विश्वनाथजी कराड सरांच्या प्रेरणा घेऊन घेतलेला वसा पूर्ण करणारे राजेश कराड आणि त्यांच्या कुटुंबांनी पाहिलेले प्रत्येक स्वप्न ईश्वर पूर्ण करेल याची मला खात्री आहे असा आशीर्वाद देऊन परमपूज्य विद्यानंद सागर महाराज यावेळी बोलताना म्हणाले की, परमात्मा प्रत्येकाला संधी देतो त्या संधीचं सोनं करायचं की माती हे ज्याची त्यांनी ठरवावे मात्र मिळालेल्या संधीचं परिपूर्ण सोनं कराड कुटुंबीयांनी करून दाखविले आहे. शेतकरी मेहनत करतो मात्र त्याला त्याच्या कष्टाचा




हवा तो मोबदला मिळत नाही त्यांचे हे दुःख समजून घेऊन कराड परिवाराने कारखान्याची उभारणी केली तुम्ही साथ दिली त्यातूनच हा प्रकल्प उभा राहिला यशाच्या शिखरावर पोहोचायचे असेल तर प्रत्येकाची त्या कामी निष्ठा असावी लागते असे सांगून या कारखान्याच्या कार्याला आणि प्रगतीला शुभेच्छा दिल्या.

अथक परिश्रम करणारे कराड कुटुंब असून बॉयलर अग्नी प्रदीपनाचा आजचा क्षण सुवर्ण अक्षरांनी लिहावा असा आहे शेतकऱ्याच्या हिताचा हा साखर कारखाना अल्पावधीत कुटुंब भरारी घेईल अशा हभप नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर यांनी शुभेच्छा दिल्या, तर बाबा महाराज बोराडे यांनी वारकऱ्यांचा आदर गरिबांची तळमळ आणि शेतकऱ्यांचा जिव्हाळा असणाऱ्या कराड कुटुंबीयांनी उभा केलेल्या साखर कारखान्याच्या माध्यमातून तमाम शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावेल असे बोलून दाखविले. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि उन्नतीसाठी कारखान्याची कमी काळात उभारणी केली असे सांगून नाथसिंह देशमुख यांनी ऊस वेळेवर जावा आणि त्यांना योग्य तो भाव मिळावा एवढीच शेतकऱ्यांची अपेक्षा असल्याचे सांगितले.

प्रारंभी ऋषिकेश कराड यांनी कारखान्याच्या उभारणीची माहिती देऊन उपस्थित सर्व शेतकरी सभासदांचे आपल्या प्रास्ताविकातून स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी दशरथ सरवदे यांनी आभार मानले.

याप्रसंगी भाजपा प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी, किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, महेंद्र गोडभरले, बन्सी भिसे, विष्णुदास मोहिते, वैभव सापसोड, वसंत करमुडे, सतीश आंबेकर, शाम वाघमारे, गोपाळ पाटील, डॉ. बाबासाहेब घुले, विजय मलवाडे, प्रताप पाटील, राजकिरण साठे, संजय ठाकूर, पांडुरंग गडदे, बाबासाहेब भिसे, पद्माकर चिंचोलकर, भैरवनाथ पिसाळ, आदिनाथ मुळे, अशोक सावंत, रशीद पठाण, महादेव गायकवाड, ललिता कांबळे, लता भोसले, जनाबाई साखरे यांच्यासह अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी, भागधारक, भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय....

## अर्थसंकल्पातील 'मिशन कडधान्य'

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाची सुरुवातच शेती हे विकासाचे पहिले इंजिन आहे, या वाक्याने केल्यामुळे कृषी क्षेत्रासाठी मोठ्या योजना मांडल्या जातील, अशी अपेक्षा निर्माण झाली. मोठ्या घोषणा झाल्या नसल्या, तरी कृषी अर्थव्यवस्थेशी निगडित काही वेगळे कार्यक्रम निश्चित जाहीर झाले आहेत. सहा वर्षांच्या कालावधीसाठी कडधान्य मिशन आणि पंचवार्षिक स्वरूपाचे कपास अभियान, या दोन कार्यक्रमांची घोषणा करण्यात आली, हे निश्चितच स्वागतार्ह आहे.

कडधान्य कार्यक्रमांतर्गत सहा वर्षांत यापैकी तूर, मूग आणि मसूर या तीन डाळींचे देशांतर्गत उत्पादन वाढवून त्यात आत्मनिर्भर होणे, असे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. अर्थात, कडधान्यांच्या बाबतीत असे काही होणे अपेक्षितच होते. कारण, मागील वर्षभर तरी तूर, उडीद, मसूर, मूग आणि चणा या पाच कडधान्यांच्या किमती विक्रमी पातळीवर पोहोचल्याने केंद्र सरकार अनेकदा टीकेचे धनी झाले होते. जगात क्रमांक एकचा कडधान्य उत्पादक आणि उपभोक्ता असलेला भारत पाच-सहा वर्षांनंतर परत एकदा क्रमांक एकचा आयातदार झाला होता.

वार्षिक २७० लाख टन खप असणार्या देशाचे कडधान्य उत्पादन २३५ लाख टनांच्या आसपास घसरले होते. त्यामुळे २०१६ नंतर प्रथमच देशावर ५० लाख टनांपेक्षा जास्त कडधान्य आयात करण्याची नामुष्की आली होती. यात उडीद, तूर आणि मसूर चढ्या किमतीने आयात करावे लागल्यामुळे यावर्षी आयात बिल सुमारे ३०,००० कोटी रुपयांवर जाणार आहे. म्हणजेच, एवढ्या मोठ्या प्रमाणात परकीय चलन देशाला गमवावे लागणार आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी कडधान्य आत्मनिर्भरतेला प्राथमिकता देण्यात आली आहे, हे सांगायला अर्थतज्ज्ञाची आवश्यकता नाही.

थोडे इतिहासात डोकावले तर लक्षात येईल की, कडधान्य स्वयंपूर्णतेचा हा कार्यक्रम आज पहिल्यांदाच सुरू केलेला नाही. मागील १२ वर्षांत किमान तीन वेळा असे प्रयत्न केले गेले. त्यासाठी केंद्रपरस्कृत राष्ट्रीय अन्नसुरक्षा मिशन, राज्य सरकारतर्फे राबवण्यात येणारी राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि खेड्यात चालवलेले एकात्मिक डाळ उत्पादन अभियान यासारख्या योजना अर्थसंकल्पामधूनच मांडल्या गेल्या. त्याचे तात्कालिक परिणाम काही प्रमाणात दिसले तरी त्याचे पुढे काय झाले, याबाबत निश्चित माहिती किंवा डेटा उपलब्ध नाही. परंतु, यावेळचे मिशन अधिक निग्रही आहे आणि त्यामुळे ते बर्यापैकी यशस्वी होऊन पुढील दोन वर्षांत, म्हणजेच सलग चार कृषी हंगाम संपेपर्यंत आपण निदान ९० टक्के स्वयंपूर्णता गाठलेली असेल, असे मानायला हरकत नाही. याला तशीच कारणेदेखील आहेत. यापूर्वीचे कार्यक्रम आणि यावेळच्या अभियानात एक मोठा फरक म्हणजे पूर्वीच्या कार्यक्रमात उत्पादनवाढ हे एकच सूत्र स्वीकारले गेले होते. त्याला अनुसरून जेव्हा उत्पादन वाढ झाली तेव्हा ते उत्पादन विकण्यासाठी कुठल्याही प्रकारचा सरकारी हस्तक्षेप न झाल्यामुळे किमती हमीभावाच्याही खाली घसरल्या आणि पुढील हंगामात शेतकर्यांनी कडधान्याचे क्षेत्र घटवले. परिणामी, दर दोन वर्षांनी कमी-अधिक प्रमाणात डाळींची टंचाई होतच राहिली. मात्र, मागील १५ महिन्यांत डाळींच्या महागाईने केंद्राला अक्षरश: रडवले असल्याने यावेळी सरकार मिशन मोडमध्ये आले आहे.

या योजनेत शाश्वतता येण्यासाठी केंद्राने शेतकर्यांनी पिकवलेली सर्व कडधान्ये पुढील निदान चार वर्षे सरकारी एजन्सीजद्वारे संपूर्ण खरेदीची हमी दिली आहे. त्यामुळेच या योजनेला घवघवीत नाही, तरी बर्यापैकी यश मिळेल. घवघवीत यश न मिळण्याचे कारणही तसेच आहे. कारण, ज्यावेळी देशांतर्गत कडधान्य उत्पादन मागणीच्या ८५ टक्के पातळीच्या पुढे सरकू लागते तसतसे कडधान्यांच्या किमती जोरात घसरू लागतात. अनेकदा त्या हमीभावाच्या २५-३० टक्के खाली जातात. कारण, अशावेळी म्यानमार, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, रशियासह अनेक आफ्रिकन देश, जे विविध कडधान्ये केवळ भारतीय बाजारपेठेसाठीच पिकवतात, ते किमती खूप खाली आणतात आणि भारतात डंपिंग करतात. असे करण्याचे कारण म्हणजे, भारत आणि काही अंशी चीन व पाकिस्तान सोडले तर त्या त्या देशांत कडधान्ये हे पशुखाद्य म्हणूनच जास्त वापरले जाते. त्यामुळे मिळेल त्या किमतीत ते भारतात डंपिंग करतात. परंतु, त्यामुळे येथील किमती घसरून शेतकर्यांचे अमाप नुकसान होते. जर केंद्राने डाळींचे आयात-निर्यात धोरण खुले केले आणि कडधान्य बाजारावरील इतर नियंत्रणे उठवली, तर शेतकर्यांना हमीभावापेक्षा अधिक भाव मिळून उत्पादनातील वाढ अधिक शाश्वत, सातत्यपूर्ण राहील. याचा अनुभव आपण अनेकदा घेतला आहे.

केंद्राने एक लक्षात घेण्याची गरज आहे, ते म्हणजे भारतीय शेतकर्यांना कसे पिकवायचे याचे धडे न देता फक्त चांगला भाव जरी दिला तरी ते देशाला उत्पादन वाढवून देतात. हे आपण अनेकदा अनुभवले आहे. शेवटी भाव भगवान छे ही गुजराती म्हण कृषी क्षेत्रालाही तंतोतंत लागू ठरते आणि हा चांगला भाव मिळावा म्हणून पर्यायी बाजारपेठा विकसित करण्यावर भर देणारा कार्यक्रम सहा वर्षांच्या कडधान्य मिशनला समांतरपणे आखणे तेवढेच महत्त्वाचे आहे. यामध्ये ई-नाम, ओएनडीसी आणि वायदे बाजार हेही आले. त्यामुळे स्पर्धात्मक बाजार निर्माण होऊन उत्पादकाला चांगली किंमत मिळेल आणि हे मिशन खरेखुरे यशस्वी झाले असे म्हणता येईल. म्हणजे देश डाळींचा केवळ पहिल्या क्रमांकाचा उत्पादक, उपभोक्ता न राहता तो मोठा निर्यातदार म्हणून नावारूपाला येईल. या व्यापारी फायद्याबरोबरच बाय प्रॉडक्ट म्हणून लोकसंख्येच्या प्रोटिन कमतरतेचा प्रश्न सोडवण्यासदेखील मदत होईल. कारण, कडधान्ये ही प्रोटिनचा सर्वात स्वस्त, सर्वांना परवडणारा स्रोत आहेत, असे म्हटले जाते.

# महाराष्ट्र लिहिता-वाचता न येणाऱ्यांचे राज्य होऊ द्यायचे का?

विद्यापीठे, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था व शिक्षक प्रशिक्षण संस्था यांच्या साहाय्याने 'प्रथम एज्युकेशन फाउंडेशन'ने केलेला 'न्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन' ('असर') सर्वेक्षण अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. कोविड साथकाळानंतरच्या असर सर्वेक्षण अहवालातून पुढे आलेल्या स्थितीपेक्षा या वर्षी महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता फारच खालावल्याचे अहवालातून स्पष्ट होते. कारण ज्या विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण झाले आहे त्यातील निम्म्या विद्यार्थ्यांना गणिती क्रिया करता येत नाहीत. ११ ते ९९ अंक आठवीच्या विद्यार्थ्यांना ओळखता व वाचता येत नाहीत. अगदी साध्या साध्या मूलभूत क्रिया, वाचन, अंकगणित हेही विद्यार्थ्यांना जमत नसल्याचे हा अहवाल दर्शवितो. असर अहवालामुळे महाराष्ट्राचे शैक्षणिक वास्तव समोर आले आहे. 'असर'ने महाराष्ट्रातील ६०५ जिल्ह्यांतील १७ हजार ९९७ गावांतील तीन लाख ५२ हजार २८ घरांचा आणि त्यातील वय वर्षे तीन ते १६ या गटातील सहा लाख ४९ हजार ४९१ विद्यार्थ्यांचा अभ्यास, सर्वेक्षण करून हा अहवाल सादर केला आहे. अहवाल संपूर्ण देशाचा आहे. त्यामधील महाराष्ट्राच्या शैक्षणिक दुर्दशेचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

'असर' म्हणजे वार्षिक स्थिती शिक्षण अहवाल. हे मुलांच्या शालेय शिक्षण आणि अध्ययनाच्या स्थितीचे देशव्यापी घरगुती सर्वेक्षण आहे. तीन ते १६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी शालेय स्थितीची नोंद केली जाते आणि पाच ते १६ वर्षे वयोगटातील मुलांची मजकूर वाचण्याची आणि मूलभूत अंकगणित करण्याची क्षमता तपासली जाते. तसेच शिक्षण प्रणाली बळकट करणे, शिक्षकांची क्षमता वाढवणे आणि शिकण्याचे परिणाम सुधारणे यासारख्या उद्दिष्टांवर असर काम करते. असरने २०१७ मध्ये १४ ते १८ वर्षे वयोगटातील तरुणांच्या वास्तविक जीवनातील संदर्भात मूलभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र लागू करण्याच्या क्षमतेचे सर्वेक्षण केले. २०१९ मध्ये चार ते आठ वर्षे वयोगटातील मुलांचे संज्ञानात्मक, प्रारंभिक भाषा आणि संख्या कौशल्यांच्या आधारे मूल्यांकन करण्यात आले आणि २०२३ मध्ये डिजिटल साक्षरता आणि स्मार्टफोन वापर या मुद्द्यावर मूल्यमापन करण्यात आले. आताचे सर्वेक्षण मूलभूत वाचन आणि अंकगणित कौशल्यांविषयीचे आहे.

पहिली ते दहावीतील विद्यार्थ्यांनी अवगत केलेल्या भाषिक आणि गणिती कौशल्यांच्या पाहणीवर जास्त भर या सर्वेक्षणात देण्यात आला आहे. तिसरीच्या ६३ टक्के मुलांना तर सहावी ते आठवीच्या ३० टक्के विद्यार्थ्यांना दुसरीचे मराठी पुस्तक वाचता येत नाही. सर्वेक्षणात विद्यार्थ्यांना मराठी परिच्छेद, सोपे शब्द, सोपी वाक्ये वाचता आली नाहीत तर ३.६ टक्के विद्यार्थ्यांना अक्षरे ओळखता आली पण शब्द वाचता आले नाहीत. या पेक्षा भयंकर म्हणजे १.७ टक्के विद्यार्थ्यांना अक्षरेही ओळखता येत नसल्याचे विदारक चित्र दिसले.

गणिती कौशल्यांची स्थिती भाषिक कौशल्यांपेक्षाही भयानक आहे. पाच ते १६ वयोगटातील निम्म्याहून अधिक विद्यार्थ्यांना अंकगणित जमत नाही. १ ते ९ हे अंक, ११ ते ९९ पर्यंतच्या संख्या विद्यार्थी ओळखू शकतात का, याचा अभ्यास करण्यात आला. दोन अंकी संख्येची वजाबाकी, भागाकार या पद्धतीने अंकगणितातील सर्वेक्षण झाले. त्यात आठवीच्या ६५.८ टक्के तर पाचवीच्या ६९.४ टक्के विद्यार्थ्यांना ११ ते ९९ हे अंक ओळखताही येत नसल्याची धक्कादायक माहिती या शैक्षणिक स्थितीच्या वार्षिक अहवालातून समोर आली. पाचवीतील केवळ २८.३ टक्के विद्यार्थ्यांना तर २७ टक्के विद्यार्थिनींना भागाकार येतो. तोच भागाकार आठवीतील ३३.९ टक्के मुले आणि ३८.७ टक्के विद्यार्थिनींना येतो. म्हणजे मूलभूत वाचन आणि अंकगणित क्षमतेची समस्या आजही महाराष्ट्रात व्यापक प्रमाणात दिसून येते. अकरावी, बारावी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची परिस्थिती यापेक्षा भयंकर आहे. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना विषयाचे स्पेलिंग लिहिता येत नाही. मराठीमधील मात्रा, उकार, वेलांटी समजत नाही. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना साधे साधे फॉर्म भरता येत नाहीत. मग याला जबाबदार कोण? शासन म्हणते शिक्षक तर शिक्षक म्हणतात शासन. खरे तर शासनाचे कोणतेच सर्वेक्षण शिक्षकांशिवाय पूर्ण होत नाही. शिक्षकांना वारंवार शालाबाह्य कामे दिली जातात. आता, ताबडतोब ऑनलाईन माहिती भरा म्हणून सांगितले जात असेल, तर शिक्षकांनी शिकवायचे कधी? विद्यार्थ्यांना नापास करू नये, असे शासनाचे धोरण आहे. परंतु आज दहावी, बारावी उत्तीर्ण झालेल्या व पदवी प्राप्त केलेल्याही अनेक मुलांना मराठी नीट वाचता येत नाही. अंकगणितातील गुणाकार भागाकार येत नाहीत. लगेच मोबाईलमधील कॅल्क्युलेटर काढतात. ही परिस्थिती आज आहे.



असरच्या सर्वेक्षणात एक चांगली गोष्ट आढळून आली ती म्हणजे ६३.३ टक्के विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक बाबींसाठी स्मार्टफोनचा वापर होत आहे. परंतु स्मार्टफोन वापरामुळे उद्भवणाऱ्या सुरक्षेच्या प्रश्नांबाबत हे विद्यार्थी अनभिज्ञ आहेत. हे विद्यार्थी समाजमाध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर करतात, पण ही माध्यमे वापरताना कोणती काळजी घ्यावी, याविषयी ते पुरेसे जागरुक नसतात. मुलांना मूलभूत वाचन करता यावे आणि अंकगणित कौशल्ये संपादन करता यावीत, यासाठी प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था चांगली असणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने व शिक्षकांनी ठोस पावले उचलली पाहिजेत, अन्यथा वर्षानुवर्षे अशाच अहवालांना सामोरे जात राहावे लागेल. राज्याला लाभलेला शिक्षणाचा समृद्ध वारसा पुढे न्यायचा की, महाराष्ट्राची लिहिता वाचता न येणाऱ्यांचे राज्य अशी अवस्था होऊ द्यायची, हे लवकरात लवकर ठरवावे लागेल.

# काय खरे काय खोटे?

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर प्रतिक्रिया देताना 'त्यांचे भाषण बोरिंग होते' असे वक्तव्य राहुल गांधी यांनी केले होते, तर 'एवढे लांब भाषण देताना बिचार्या राष्ट्रपती थकून गेल्या' असे विधान सोनिया गांधी यांच्याकडून आले. त्यावरून निर्माण झालेले वादळ जेमतेम शमले असतानाच, आज पुन्हा राहुल गांधी यांच्या संसदेतील एका वक्तव्यावरून नवीन वादंग उभे केले गेले आहे. संसदेत आज भाषण करताना राहुल गांधी असे म्हणाले की, 'भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर हे अमेरिकेत पंतप्रधान मोदींना, ट्रम्प यांच्या शपथविधीसाठीचे निमंत्रण मागण्यासाठी गेले होते.' त्यावरून हे वादंग सुरू करण्यात आले आहे.





राहुल गांधी यांचे आज लोकसभेत झालेले भाषण बर्यापैकी चमकदार होते, पण त्यातील ज्या दोन मुद्द्यावर सभागृहात गदारोळ झाला त्यातला हा एक प्रमुख मुद्दा होता. राहुल गांधी हे देशाच्या पंतप्रधानांचा आणि देशाचा अपमान करीत आहेत असे वक्तव्य करीत केंद्रीय मंत्री किरेन रिजीजू यांनी त्यांना सभागृहातच प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. बाकीच्या भाजप सदस्यांनीही बराच गदारोळ केला. संसदेचे हे कामकाज पाहात असताना आज एक वेगळीच गंमत अनुभवाला आली. राहुल गांधी यांचे आजचे भाषण सफाईदार इंग्रजीत होते, त्यांनी एस जयशंकर अमेरिकेत मोदींना निमंत्रण मिळवण्यासाठी गेले होते, असे विधान केल्यानंतर बर्याच वेळाने ही बाब सत्ताधारी पक्षाच्या लक्षात आली आणि मग त्यांनी हा गदारोळ सुरू केला.

एरवी त्या क्षणी सत्ताधारी वातावरण आरडाओरडा सुरू होतो पण यावेळी थोडा तो विलंबाने झाला. राहुल गांधी यांच्या विधानावर पलटवार करण्यास जयशंकर यांनी मात्र फार विलंब लावला नाही. जयशंकर यांनीही लगेच एक निवेदन सभागृहाबाहेर जारी करत राहुल गांधी खोटं बोलत असल्याचे म्हटले आहे. आपण त्यावेळी अमेरिकेत बायडेन प्रशासनाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि अन्य अधिकार्यांशी चर्चा करायला गेलो होतो, मोदींसाठी निमंत्रण मागायला गेलो नव्हतो, असे जयशंकर यांनी म्हटले असून त्यांनी राहुल गांधींकडे याबाबत अधिक स्पष्टीकरण देण्याची मागणी केली आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधीच्या कार्यक्रमाला चीनचे अध्यक्ष आणि अन्य देशांच्या राष्ट्रप्रमुखांना निमंत्रण दिले गेले होते, पण भारतीय पंतप्रधानांना हे निमंत्रण नव्हते. त्यामुळे हे निमंत्रण पदरात पाडून घेण्यासाठीच जयशंकर तातडीने अमेरिकेला गेले असल्याची बातमी प्रसिद्धी माध्यमांमध्ये त्याच सुमाराला चर्चेत होती. या चर्चेलाही बरेच दिवस झाले, पण त्यावेळी मात्र सरकारकडून कोणताही खुलासा आला नाही. किंबहुना ही बातमी माध्यमांमध्ये येऊच दिली गेली नाही, पण जेव्हा राहुल गांधी यांनी संसदेत त्या आधारावर आरोप केला त्यावर मात्र आता जोरदार वादंग सुरू झाला आहे. यातले नेमके खरे काय आणि खोटे काय याचा खुलासा झाला तर तो आता अमेरिकेतूनच होईल, अन्यथा येथे जयशंकर आणि सरकारने राहुल यांच्या दाव्याचा इन्कार करीत त्यांना धारेवर धरले आहे. राहुल गांधी यांचे आजचे संसदेतील भाषण विविध मुद्द्यांवर भाष्य करणारे होते. जातीय जनगणना आणि दलित तसेच अन्य मागासवर्गीयांवर होणार्या अन्यायाचे नेहमीचे मुद्दे त्यांनी यावेळी उपस्थित केलेच; पण त्यांचे हे भाषण सुरू असताना आज बर्याच दिवसांनी खुद्द पंतप्रधान सभागृहात उपस्थित होते. त्यामुळे पंतप्रधानांना डिवचण्याची संधी राहुल गांधींनी सोडली नाही. चीनने भारतात केलेल्या आक्रमणाविषयी भाष्य करताना राहुल गांधी म्हणाले की, 'चीनने भारतात घुसखोरी केल्याचा पंतप्रधानांनी इन्कार केला; पण देशाच्या लष्कर प्रमुखांनी मात्र पंतप्रधानांचा हा इन्कार खोडून काढत चीनने भारतीय भूमीवर आक्रमण केल्याची बाब स्पष्टपणे मान्य केली, असे ते म्हणाले. त्यावरूनही सत्ताधारी बाकावरून जोरदार प्रतिवाद सुरू झाला. पण त्याला तितक्याच तत्परतेने राहुल गांधी यांनी पुन्हा संदर्भासहित स्पष्टीकरण दिल्याने हा मुद्दा तेथेच थांबला. पण जयशंकर यांच्या अमेरिकन दौर्याविषयीचे वक्तव्य मात्र संसदेच्या कामकाजानंतरही गाजत राहिले आहे. या भाषणात राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत लोकसभेनंतर केवळ पाच महिन्यांत तब्बल ७० लाख मतदार कसे वाढले, असा विषय उपस्थित करून निवडणूक आयोगाच्या आणि सरकारच्या कामकाजाबद्दल काही तिखट प्रश्न उपस्थित केले; पण त्यावर मात्र सत्ताधारी भागावर शांतताच दिसली. राहुल गांधी लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत, त्यांचे पद घटनात्मक स्वरूपाचे आहे आणि त्यांच्या प्रत्येक वक्तव्याची बारीक स्वरूपाची छाननी होत असल्याने प्रत्येक वाक्य किंवा विधान ते अतिशय खात्रीपूर्वक स्वरूपात करत असतात असा अनुभव आहे. त्यामुळे त्यांनी जयशंकर यांच्या बाबतीत केलेले विधान धादांत खोटे आहे असे ठोसपणे म्हणता येणार नाही, पण त्याच वेळेला सरकार मात्र राहुल गांधी साफ खोटे बोलत आहेत असे जर म्हणत असेल, तर याची सत्यासत्यता कशी पडताळायची हा देशातल्या सामान्य नागरिकांना पडलेला प्रश्न आहे. आता बहुधा अमेरिकन प्रशासनातील अधिकार्यालाच एखाद्या पत्रकार परिषदेत यावर प्रश्न विचारला जाईल आणि त्यावर त्यांच्याकडून जे उत्तर येईल त्यातून नेमका खुलासा लोकांना होईल अशी अपेक्षा आहे. पण मुद्दा असा आहे की संसदेचे महत्त्वाचे अधिवेशन सुरू असताना आणि कुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीच्या घटनेबद्दल प्रामुख्याने चर्चा होणे अपेक्षित असताना हे असले कमी महत्त्वाचे मुद्दे फार रंगवून गाजवले जातात त्याविषयी लोकांमध्ये नाराजी आहे. अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर देशाच्या आर्थिक बाबतीतही सांगोपांग चर्चा होणे अपेक्षित आहे, पण संसदेचा चर्चेचा रागरंग मात्र भलत्याच दिशेने जाताना दिसतो आहे.

# उर्वरीत सोयाबीन खरेदी करीता ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ द्या -खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर कृषी मंत्र्यांची भेट घेवून केली मागणी

धाराशिव / प्रतिनिधी :- केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांची भेट घेवून धाराशिव लोकसभा मतदार संघातील सर्व ११ तालुक्यातील नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडील सोयाबीन करीता मुदतवाढ देणेबाबत खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्याकडून विनंती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील उस्मानाबाद (धाराशिव), लातूर जिल्ह्यातील औसा आणि निलंगा तालुक्यातील आणि सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या नाफेड योजनेअंतर्गत सोयाबीन विक्रीसाठी नोंदणी केली होती. एकूण ४४,०१३ शेतकऱ्यांपैकी आतापर्यंत फक्त १५,७४९ शेतकऱ्यांकडून सोयाबीन खरेदी करण्यात आले आहे, तर उर्वरित २८२६४ नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून सोयाबीन खरेदी अद्याप प्रलंबित आहे.

तुम्ही दिलेल्या माहितीनुसार, धाराशिव जिल्ह्यात २३००९ शेतकरी आहेत, औसा आणि निलंगा तालुक्यात ४५०६ शेतकरी आहेत, बार्शी तालुक्यात ७४९ शेतकरी आहेत. एकूणच, माझ्या लोकसभा मतदारसंघातील अकरा तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांची संख्या सुमारे २८२६४ आहे. अशाप्रकारे, एकूण नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून सुमारे ३६% सोयाबीन खरेदी करण्यात आले आहे, तर उर्वरित ६४% सोयाबीनची खरेदी अद्याप प्रलंबित आहे.

नाफेडने नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडून सोयाबीन खरेदी. हे १० डिसेंबर २०२४ रोजी सुरू झाले होते, तर दोन महिन्यांनंतर फक्त ३६% सोयाबीन खरेदी करण्यात आले आहे. केंद्र सरकारने खरेदीची अंतिम मुदत ०६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत वाढवली आहे. उर्वरित ६४% सोयाबीन अवघ्या ४ दिवसांत



खरेदी करणे जवळजवळ अशक्य आहे. खरेदीची अंतिम मुदत चार दिवसांनी संपत असल्याने, मोठ्या संख्येने शेतकरी अजूनही यापासून वंचित आहेत. त्यांचे उत्पादन विकणे. ज्यामुळे त्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. उर्वरित नोंदणीकृत २८२६४ शेतकऱ्यांकडून सोयाबीन खरेदी करण्याची वेळ मर्यादा वाढवावी अशी मागणी आज खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्याकडून करण्यात आली आहे.

# राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाच्या राज्य कार्याध्यक्ष पदी प्रा. डॉ. दशरथ रोडे यांची फेर नियुक्ती

नाशिक / प्रतिनिधी :- राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाच्या वतीने आज राज्यस्तरीय साप्ताहिक दुसरी झुम बैठकीचे २ फेब्रुवारी शनिवार रोजी आयोजन करण्यात आले होते. राज्यस्तरीय साप्ताहिक झुम बैठकीत राज्य कार्यकारिणीत राज्य कार्याध्यक्ष-प्रा. डॉ. दशरथ वैजनाथ रोडे यांची राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष. संतोष निकम यांनी फेर नियुक्तीची घोषणा करण्यात आली.




सदरील राज्यस्तरीय साप्ताहिक झुम बैठक निकम सर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीला राज्यातून राज्य कार्यकारिणीचे वरीष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष, उपाध्यक्ष ,सचिव , मराठवाड्यातील पदाधिकारी उपस्थित होते. मराठवाड्यासह खान्देश, विदर्भ, कोकण, उत्तर महाराष्ट्र, मुंबई विभाग संघाचे जोरदार विस्तार, संघटन व सुधारणा तयारी सुरू केली आहे. संघाने देशातील अन्य राज्यांतील सभासद नोंदणी करण्यासाठी मोहिम हाती घेवून विस्तार करण्यास अधिक लक्ष केंद्रित केले आहे. राष्ट्रीय अध्यक्ष संतोष निकम यांच्याशी संपर्क करून माजलगाव तालुक्यात राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाच्या बैठकीस परवानगी घेऊन राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत कांबळे यांनी हिंगोली जिल्हा कार्यकारिणीसोबत सर्व तालुक्यांची संपादक, पत्रकार, विविध समित्यांचे पदाधिकारीपूर्ण करून वरिष्ठांच्या आदेशानुसार कार्य करण्याचे आदेश दिले.

दैनिक परळी सन्मान चे मुख्य संपादक तथा महाराष्ट्र प्रदेश राज्य कार्याध्यक्ष. डॉ दशरथ वैजनाथ रोडे यांनी फेर नियुक्ती करण्यात आली. राज्यात पत्रकारिता,सामाजिक ,शैक्षणिक ,सांस्कृतिक साहित्यिक विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणासाठी पुन्हा संघाच्या वतीने त्यांना करण्याची संधी दिली जाईल . मा . निकम सरांनी प्रा डॉ दशरथ रोडे स्वतःचे वृत्तपत्र, साप्ताहिक. जन सन्मान पासून ते दैनिक परळी सन्मान आणि पत्रकार, संघटनेचे आयुष्य प्रचार व प्रसार अतिशय शिस्तबद्ध व परिश्रम, व्यक्तीमत्व आहे. राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ त्यांच्या पाठीशी सदैव राहील. राज्यस्तरीय साप्ताहिक झूम बैठकीत महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्यकारिणीच्या सर्व वरीष्ठ सभासदांनी अभिनंदन केले.

# सकाळच्या वेळी झोपेतून उठल्यानंतर चेहऱ्यावर लावा 'हे' पदार्थ, दिवसभर त्वचा राहील फ्रेश आणि ताज़ीटवटवीत

सर्वच महिला त्वचेच्या आरोग्याची काळजी घेतात. चमकदार आणि गोरीपान त्वचा मिळवण्यासाठी अनेक प्रयत्न केले जातात. मात्र खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये किंवा वातावरणात होणाऱ्या बदलांमुळे त्वचा अधिक कोरडी आणि निस्तेज होऊन जाते. त्वचेची गुणवत्ता खराब झाल्यानंतर ती सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागतात. त्यामुळे दैनंदिन आहारात खाण्यापिण्याच्या सवयींकडे योग्य लक्ष देणे आवश्यक आहे. अनेक महिला सुंदर त्वचेसाठी बाजारात उपलब्ध असलेल्या महागड्या आणि केमिकल युक्त प्रॉडक्टचा वापर करतात. मात्र यामुळे काहीकाळ त्वचा अधिक सुंदर आणि चमकदार दिसते. पण पुन्हा एकदा त्वचा होती तशीच होऊन जाते.



त्वचेसंबंधित समस्या वाढू लागल्यानंतर महिला सतत काहींना काही उपाय करतात. कधी फेशिअल करून घेणे, तर कधी महागड्या ट्रीटमेंट करून घेतल्या जातात. मात्र या ट्रीटमेंट केल्यानंतर काहीकाळ त्वचा अधिक सुंदर दिसते. पण कालांतराने पुन्हा एकदा त्वचा होती तशीच होऊन जाते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सुंदर आणि फ्रेश त्वचेसाठी सकाळी उठल्यानंतर कोणते पदार्थ त्वचेला लावल्यास त्वचा अधिक सुंदर होईल, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया. कोरफडचा गर: मागील अनेक वर्षांपासून त्वचेसंबंधित समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी कोरफडचा वापर केला जात आहे. कोरफड त्वचा हायड्रेट ठेवण्यासाठी मदत करते.

नियमित कोरफडचा वापर त्वचेसाठी केल्यास त्वचेवर टॅन कमी होऊन चेहरा खुलून दिसेल. यासाठी सकाळी झोपेतून उठल्यानंतर त्वचेवर कोरफड जेल लावून त्वचा काहीवेळ हलक्या हाताने मसाज करून घ्या. यामुळे त्वचेवरील रक्तभिसरण सुधारेल आणि चेहरा स्वच्छ होईल. चेहऱ्यावरील डाग, ड्रायनेस, टॅनिंग घालवण्यासाठी कोरफड गराचा वापर करावा. गुलाब पाणी:

सकाळी उठल्यानंतर सगळ्यात आधी चेहरा पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर चेहऱ्यावर टोनर म्हणून गुलाब पाण्याचा वापर करा. गुलाब पाणी त्वचा हायड्रेट ठेवण्याचे काम करते. कापसाच्या मदतीने तुम्ही त्वचेवर गुलाब पाणी लावू शकता. यामुळे त्वचेवरील घाण, धूळ, माती स्वच्छ होण्यास मदत होईल आणि त्वचा अधिक उठावदार दिसेल. त्वचेसाठी करा 'या' औषधी वनस्पतींचा वापर! पिगमेंटेशन, पिंपल्सची समस्या होईल कायमची दूर मध: खराब झालेली त्वचेची गुणवत्ता सुधारण्यासाठी मधाचा वापर करावा.

# बल्लारशाहवरू सुटल्याने प्रवाशांच्या झाला तोटा,नंदिग्राम एक्सप्रेसचा किनवटच्या कोटा मिळेना

किनवट: शेख शौकत :आदिलाबाद ते नांदेड या मार्गावर सर्वाधिक उत्पन्न देणारे स्टेशन म्हणून किनवट रेल्वे स्टेशनची नोंद असली तरी किनवटहून मुंबईसाठी जाणाऱ्या प्रवाशांच्या तत्काळ कोटचात मोठी घट केल्याने प्रवाशांची मोठी कुचंबणा होत आहे. रेल्वे विभागाचा हा अन्याय का? असा प्रश्न परवाशाकडून विचारला जात आहे. नागपूर ते मुंबई ही नंदीग्राम एक्स्प्रेस सुरु असताना वातानुकूलित टु टायर व थ्री टायर कोटा अधिक होता नागरिकाकडून असे प्रश्न विचारले जात आहे. आता ही नंदीग्राम एक्स्प्रेस बल्लारशाहतरून जसा विस्तार झाला तेव्हापासून किनवट येथील कोटा घटवण्यात आला आहे. टू टायरचा तत्काळ कोटा केवळ दोनचा तर थ्री टायरचा १२ वर आला आहे. त्यामुळे तत्काळचे तिकीट करण्यासाठी रेल्वे स्टेशनवर येणाऱ्या प्रवाशांना टू टायरचे वातानुकूलित तिकीट मिळत नसल्याने निराश होऊन प्रवाशाची परत जाण्याची वेळ आली असे बोलल्या जाता आहे.किनवट येथून मुंबई पुणे व राज्याच्या अनेक भागांत रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक आहे. कारण, माहूर येथे रेणुकामाता दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. वातानुकूलित टू टायर तत्काळ तिकिटांचा कोटा दोनवरून



:इंटरसिटीची डोकेदुखी काही केल्या थांबेना!

आदिलाबाद ते नांदेड ही इंटरसिटी तिरुपती ते आदिलाबाद या कृष्णा एक्स्प्रेसवर अवलंबून असल्याने ती कधी वेळेवर तर कधी विलंबाने धावत आहे. त्यामुळे प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

आठवड्यात तीन दिवस वेळेवर तर चार दिवस लेट हा प्रकार सुरू आहे. कृष्णा एक्स्प्रेस लेट झाली तर इंटरसिटी नांदेड ऐवजी मालटेकडीपर्यंत जात आहे. तिकीट मात्र नांदेडचे काढावे लागते. प्रवाशांची ही डोकेदुखी थांबविण्यासाठी प्रशासनाने स्पेशल १७ डब्यांची आदिलाबाद ते नांदेड इंटरसिटी सोडावी, अशी मागणी परवाशाकडून होत आहे.

तो वाढता, अशी मागणी प्रवाशा व नागरिकाकडून होती आहे.

# माजी सैनिक राजाराम साबळे नेताजी सुभाष चंद्र बोस राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

लातूर :- मेजर जनरल राजाराम साबळे यांनी बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया व समता सैनिक दलाच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यात व ग्रामीण भागात समता सैनिक दलाची उभारणी केली. लातूर जिल्ह्यामध्ये समता सैनिक दल निर्माण करण्यामध्ये आयु. साबळे सरांचा सिंहाचा वाटा आहे, त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र सोशल असोसिएशन च्या वतीने २०२५ चा मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जाणारा *नेताजी सुभाषचंद्र बोस राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार माजी खासदार डॉ. सुनील बळीराम गायकवाड यांच्या हस्ते समता सैनिक दलाचे लातूर जिल्हा प्रमुख माजी सैनिक राजाराम साबळे यांना दयानंद कला महाविद्यालया च्या सभागृहात शाल,स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देवून सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीकिशन भन्साळी (अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा)हे होते तर उद्घाटक म्हणून ह.भ.प.महादेव महाराज आडसुळ धाराशिव, व प्रमुख पाहुणे म्हणून युवा भीम सेना संस्थापक अध्यक्ष पंकज भाऊ काटे, बालाप्रसाद सोमानी मुख्य संयोजक तथा सचिव सुफी सय्यद शमोशोद्दीन व इतर पदाधिकारी यांची उपस्थिती होती.



यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा कोषाध्यक्ष ज्ञानेश्वरी ताई बटवाड, डिव्हिजन ऑफिसर विलास आल्टे, डिव्हिजन ऑफिसर विकास दंतराव, जिल्हा सचिव अभिमन्यू लामतुरे, जिल्हा सचिव आनंद डोणेराव, जिल्हा संघटक अर्जुन कांबळे, राजेंद्र क्षीरसागर, राजाभाऊ उबाळे, देवराव जोगदंडे, कविताताई कांबळे, मायाताई कांबळे, सपना देडे, सुनिता ताई भालेराव, इत्यादी उपस्थित होते तसेच या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला आणि पुरुष उपस्थित होते.

# घरकुलचे थकित अनुदान लवकरच मिळणार नगराध्यक्ष फिरोज दोसानी

किनवट: शेख शौकत :-मागील अनेक दिवसापासून माहूर शहरातील पंतप्रधान आवस योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदानाची प्रतीक्षा होती. मात्र ही प्रतीक्षा आता संपली असून शासनाकडून घरकुलाचे अनुदान प्राप्त झाल्याने येत्या दोन दिवसात थकीत हप्ते लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार असल्याची माहिती नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी दिली आहे. माहूर शहरात पंतप्रधान घरकुल योजनेचे लाभार्थी मोठ्या प्रमाणात आहेत. या योजने अंतर्गत लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करण्या करिता अनुदानाचा पहिला व दुसरा, तिसरा हप्ता देण्यात आला आहे. तर कुठे कुठे पहिल्याच हप्त्यावर काम थांबले होते, त्यामुळे उर्वरित रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा न झाल्याने उर्वरित बांधकाम ठप्प झाले. काहीनी बांधकाम पूर्ण केले मात्र अनुदान मिळाले नसल्याने ते कर्ज बाजारी झाले होते. लाभार्थ्यांचे रखडलेले अनुदान त्यांना मिळावे या साठी म्हाडा सह शासन दरबारी नगराध्यक्ष फिरोज दिसानी, मुख्याधिकारी विवेक काद उपनगराध्यक्ष नाना लाड, कार्यालय अधीक्षक वैजनाथ स्वामी यांचे सह सर्व नगरसेवकांनी सुरवाती पासूनच पाठ पुरावा केला होता. परंतु शासनाकडून अनुदान मिळण्यासाठी विलंब होत होता. मात्र आता ही प्रतीक्षा संपली असून शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्याने येत्या दोन दिवसात ज्या लाभार्थ्यांचे बांधकाम झाले आहे, किंवा ज्यांचे काम प्रगती पथकावर आहे. त्या सगळ्या लाभार्थ्यांचे थकीत अनुदान त्यांचा बँक खात्यात जमा होणार असल्याची माहिती नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी दिली आहे.



## जुक्टा संघटनेच्या लातूर विभागीय अध्यक्षपदी प्रा.बाळासाहेब बचाटे तर उपाध्यक्षपदी डॉ किशन गायकवाड यांची निवड .

चाकूर: लातूर जिल्ह्याची विभागीय बैठक औसा येथे रविवारी संपन्न झाली. बैठकीत प्रा बाळासाहेब बचाटे यांची बिनविरोध विभागीय अध्यक्ष तर प्रा किशन गायकवाड उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. या बैठकीसाठी विभागीय निरीक्षक म्हणून महासंघाचे उपाध्यक्ष प्रा. विलास जाधव यांनी काम पहिले. लातूर,धाराशिव,नांदेड विभागातील अध्यक्ष सचिव यांची बैठक घेऊन त्या बैठकीत लातूर विभागीय कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. रविवारी झालेल्या महासंघ बैठकीत पुणे येथील महासंघाच्या बैठकीत दि २ फेब्रुवारी २०२५ रोजी वाडिया कॉलेज पुणे येथे यास अधिकृत मान्यता देण्यात आली. विभागीय कार्यकारणीत राज्य कार्याध्यक्ष म्हणून प्रा. रमेश नन्नावरे धाराशिव, प्रा.नारायण गाढवे यांची सचिव म्हणून तर प्रा. शिवराम सूर्यवंशी हे राज्य प्रतिनिधी राज्य प्रतिनिधी, विभागीय कोषाध्यक्ष प्राध्यापक आर पी केंद्रे व देशमुख प्रसिद्धी प्रमुख प्रा.राजेंद्र नागरगोजे महिला प्रतिनिधी म्हणून प्रा.सुजाता कांबळे नांदेड, प्रा.रोडे लातूर यांची बिनविरोध निवड करण्यात आली या बैठकीसाठी निरीक्षक म्हणून महासंघाचे उपाध्यक्ष विलास जाधव यांनी काम पाहिले व त्याला महासंघाची मान्यता दिली. या बैठकीला मार्गदर्शक म्हणून प्रा.शिवाजी शिंदे, प्रा, मुकुंद बोकारे, मोतीभाऊ केंद्रे विभागातील पदाधिकारी उपस्थित होते. या निवडीचे विभागातून स्वागत व अभिनंदन होत आहे.



# अनावश्यक खर्च टाळून अन्नछत्राला मदत देऊन वाढदिवस साजरा

चाकूर: येथील शिक्षक तथा पत्रकार सामाजिक कार्यकर्ते सुशिल वाघमारे यांनी मात्र समाजासमोर एक आदर्श घडवून आणला आहे. रविवारी सकाळी त्यांनी ओम साईप्रसाद अन्नछत्र चाकूर येथे अन्नदान करून आर्थिक मदत करत वाढदिवस साजरा केला.




वाढदिवस असो वा अँनिवर्सरी यासाठी मोठ्या प्रमाणात अनावश्यक खर्च केला जातो हा खर्च टाळता देखील येते. असाच संकल्प करत अनावश्यक खर्चाला फाटा देत सामाजिक ,शैक्षणिक, पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असणारे सुशिल वाघमारे यांनी अन्नछत्रात आर्थिक मदत करत एक नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. याचबरोबर शहरातील एका अभ्यासिकेला काही पुस्तके दान दिले. यावेळी जीत माळी, मुरलीधर घाटे, आत्माराम डाके, चेतन होळदांडगे, बाळू गोलावार, सचीन ढोबळे, पारिजात सुवर्णकार अमर गुरव, दिगंबर मोरे अन्नछत्राचे कर्मचारी उपस्थित होते.

वाढदिवसानिमित्त राबविलेल्या या उपक्रमाबद्दल सर्व स्तरातून सामाजिक कार्यकर्ते सुशिल वाघमारे यांचे कौतुक केले जात आहे.

# चांदापुर येथे अकराव्या बौद्धधम्म परिषदेचा शानदार समारोप

## भारत ही बुद्धभूमी : बाबासाहेबांच्या विचारांची जगाला गरज ; 'विपश्यना' साठी ही भुमी योग्य – पुज्य भिक्खू डॉ.लि.ची.रान

अंबाजोगाई /प्रतिनिधी :– परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा, मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा – क प्राप्त) येथे प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी अकराव्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या धम्म परिषदेला अखिल भारतीय भिक्खू महासंघाचे कार्याध्यक्ष पुज्य भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो (पुर्णा) यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. या धम्म परिषदेचे उद्घाटक म्हणून पुज्य भिक्खू थेर इम चांग व्वू (मुख्य संस्थापक, बुलम्वांगडोंगजोल विहार, दक्षिण कोरिया) तर विशेष अतिथी म्हणून पुज्य भिक्खू डॉ.लि.ची.रान (माजी कुलगुरू, कोरियन बुध्दीस्ट विद्यापीठ, दक्षिण कोरिया), पुज्य भिक्खू महाविरो थेरो (काळेगाव अहमदपुर), पुज्य भिक्खू धम्मशील थेरो ( शिवणी, बीड) आणि पुज्य भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) भंते मैत्रेय (छ संभाजी नगर) भन्ते मैत्रेय संबोधी( बार्शी) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी, चांदापुर (परळी वै.) येथे ही धम्म परिषद आयोजित करण्यात आली होती. मागील काही वर्षांपासून बौद्ध धम्म उपासकांसाठी नांवारूपास आलेले सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्र तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी, जि.बीड) यांच्या वतीने तालुक्यातील चोखामेळा सहकारी सोसायटी, वसंतनगर तांडा, मौजे चांदापूर, ता.परळी येथे रविवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी येथे अकराव्या बौद्ध धम्म परिषदेची सुरूवात पंचरंगी धम्म ध्वजारोहणाने करण्यात आली. या धम्म परीषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनीचे अध्यक्ष ॲड.अनंतराव जगतकर हे होते. तर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार संजय दौंड, माजी लेफ्टनंट कर्नल डॉ.एम.एच.कांबळे तर यावेळी नालंदा अकादमीचे अध्यक्ष चंद्रशेखर वडमारे, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, कृषी तज्ज्ञ डॉ.मधुकर खळगे, समाजभूषण आनंद वाघमारे, बौद्धाचार्य आनंद तुपसमुद्रे, मिलिंद नरबागे, श्रावण बनसोडे, महादेव बनसोडे, संग्राम गित्ते (सरपंच, चांदापुर), प्रशांत गित्ते (ग्रा.पं.सदस्य,चांदापूर.), उपमुख्याध्यापक विलास गायकवाड, गोल्ड मेडल प्राप्त वंदना राहुल सुरवसे, बौद्धाचार्य सचिन रणखांबे तसेच प्रसिद्धीप्रमुख प्रा.बालाजी जगतकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या प्रसंगी धम्म देसना देताना पुज्य भिक्खू माजी कुलगुरू डॉ.लि.ची.रान म्हणाले की, चांदापूर हा परिसर नैसर्गिक आहे. मेडिटेशन करण्यासाठी उत्तम ठिकाण आहे. येथील ध्यान केंद्राचा सर्वांना फायदा होईल. संबोधी, निर्वाण प्राप्त करण्यासाठी अशीच जागा लागते. भारत ही बुद्धभूमी आहे. सम्राट अशोक यांनी भारतासह जगात बुध्द धम्म रूजविला. तर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बुध्द धम्माचे पुनरूज्जीवन केले. त्यामुळे बाबासाहेबांच्या विचारांची जगाला गरज आहे. भारतात जीवंत बुध्दीझम पहावयास मिळतो असे गौरवोद्गार पुज्य भिक्खू डॉ.रान यांनी काढले. तर पुज्य भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो यांनी आपण शुध्द झाले पाहिजे, भिक्खू तयार करणे, ज्ञानी माणसं तयार करणे हा या धम्म परिषदेचा मुख्य उद्देश आहे. बाबासाहेबांनी आपल्याला दिलेले संविधान वाचविण्यासाठी आपण सामुहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे असे पुज्य भदन्त डॉ.महाथेरो म्हणाले. तर पुज्य भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) यांनी धम्म मनाची मशागत करतो, त्यामुळे धम्म पुढील पिढीला देण्यासाठी अशा धम्म परिषदा आवश्यक आहेत असे पुज्य भिक्खू पय्यावर्धन म्हणाले. तर यावेळी पुज्य भदन्त महाविरो म्हणाले की, बुध्द धम्म हा



सदाचार शिकवतो, त्यामुळे सुखाच्या प्राप्तीसाठी धम्माची वाट चालावी लागेल, धम्माचा अंतिम उद्देश समजून घ्या, आधुनिक समाजात सदाचार व दुराचार यांचे युद्ध सुरू आहे. मानवाने चिंतन व मनन करावे, चिवर आणि भिक्षापात्र ही धनसंपत्ती सर्वश्रेष्ठ आहे. असे सांगून पुज्य भदन्त महाविरो यांनी कुशल कर्म, त्रिशरण, पंचशील, अष्टांग मार्ग, दहा पारमिता, कर्मवाद, धम्म संस्कार, दानाचे महत्व विषद केले. यावेळी पुज्य भिक्खू धम्मशील थेरो यांनी धम्म परिषदस उपस्थित उपासक, उपासिका यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी आमदार दौंड यांनी मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा – क प्राप्त) यांना शासनामार्फत आवश्यक निधी व आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. प्रारंभी डॉ.राजेश इंगोले, डॉ.मधुकर कांबळे, प्रा.डॉ.मधुकर खळगे यांनी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप ॲड.अनंतराव जगतकर यांनी केला. प्रास्ताविक राजेंद्र घोडके यांनी केले. तर सुत्रसंचालन जगन सरवदे आणि सचिन रणखांबे यांनी करून उपस्थितांचे आभार राहुल सुरवसे यांनी मानले. धम्म परिषदेच्या ठिकाणी परळी ग्रामीण पोलीस यांचे सुरक्षा पथक उपलब्ध करून देण्यात आले होते. या धम्म परिषदेत महत्वपुर्ण ठराव मांडण्यात येवून ते पारित करण्यात आले. हे ठराव केंद्र व राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे यावेळी जाहिर करण्यात आले. ठरावांचे वाचन प्रा.गौतम गायकवाड यांनी केले. धम्म उपासक हे पांढरे वस्त्र परिधान करून धम्म परिषदेत सहभागी झाले होते. धम्म परीषदेच्या पार्श्वभूमीवर रमाई चौक, कबीरनगर, अंबाजोगाई, जवळगाव, पुस, घाटनांदूर, उजनी, पट्टीवडगाव, नागापूर मांडवा (प), डाबी या गावांतून धम्म रॅली काढण्यात आली. धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तीर्थक्षेत्र तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै.जि.बीड) चे पदाधिकारी धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै.जि.बीड) चे पदाधिकारी चंद्रकांत इंगळे, प्रा.प्रदीप रोडे, राजेंद्र घोडके, राहुल घोडके, प्रा.गौतम गायकवाड, व्यंकट वाघमारे, सचिन वाघमारे, जगन सरवदे, विश्वनाथ भालेराव, सीमाताई इंगळे तसेच चंद्रकांत बनसोडे, शाहीर गौतम सरवदे, सुरेश कांबळे, किशोर इंगळे, आकाश वेडे, सुशिल इंगळे, नागेश जोंधळे, राहुल सुरवसे, बी.एस.बनसोडे आदींनी पुढाकार घेतला

# वेळूवन बुद्ध विहारामध्ये एकदिवसीय अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर व सुभेदार रामजी आंबेडकर यांचा स्मृतीदिन कार्यक्रम संपन्न भारतीय बौद्ध महासभेचा स्तुत्य उपक्रम

केज/प्रतिनिधी भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेच्या वतीने एक दिवसीय अंधश्रद्धा निर्मूलन शिबिर व सुभेदार रामजी मालोजी आंबेडकर यांचा स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.केज शहरातील भीमनगर येथील वेळूवन बुद्ध विहारामध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडून स्थापित या मातृसंस्थेकडून समाजोपयोगी विविध उपक्रम राबविण्यात येतात. धम्म प्रसारासोबतच विज्ञाननिष्ठ समाज घडविण्यासाठी संस्थेकडून प्रयत्न होत असतात. भारतीय बौद्ध महासभेचे शहर अध्यक्ष आयु.डॉ.प्रभाकर ठोके यांच्या अध्यक्षतेखाली व आयु.जयपाल मस्के, चंद्रकांत मस्के, महेंद्र मस्के यांच्या नियोजनाने हे शिबीर व अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.सर्वप्रथम शिबिराची सुरुवात आदर्शांना वंदन व सुभेदार रामजी आंबेडकर यांना अभिवादन करून झाली.यानंतर सामूहिकपणे त्रिसरण व पंचशील घेण्यात आले.भारतीय बौद्ध महासभेचे बीड जिल्हा पूर्वचे जिल्हाध्यक्ष आयु.बी.बी.धन्वे यांनी शिबिराचे उद्घाटन केले व प्रमुख मार्गदर्शिका आयुनी.स्वातीताई गायकवाड यांचा परिचय दिला.यावेळी आयुनी.सुनिता कांबळे यांची कन्या कु.पुजा कांबळे हिची सरकारी रुग्णालयात किटकशास्त्रज्ञ म्हणून निवड झाल्याबद्दल तिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

दोन सत्रामध्ये शिबीर संपन्न झाले.पहिल्या सत्रामध्ये श्रद्धा–



अंधश्रद्धा यातील फरक,अंधश्रद्धा ही सामाजिक समस्या तसेच अंधश्रद्धा व भोंदुगिरीचे प्रकार सांगुन महिलांना यात कसे फसवले जाते व त्यांचे शोषण कसे होते याबाबत माहिती सांगितली. दुसऱ्या सत्रात ज्योतिष शास्त्र आहे का? या विषयावर आयु.बी.बी. धन्वे यांनी विविध दाखले,पुरावे देवून सखोल मार्गदर्शन केले यानंतर आयुनी.गायकवाड यांनी चमत्कारामागचे विज्ञान समजावून सांगण्यासाठी विविध प्रयोग–प्रात्यक्षिके सादर केली.ज्यामध्ये पाण्याचा दिवा पेटवणे,वातीविना दिवा पेटवणे,नारळ फोडल्यानंतर आत वेगवेगळ्या वस्तु निघणे,लिंबु कापल्यानंतर त्यातही वस्तु निघणे,मंत्राने अग्नी पेटवणे व इतर प्रयोग सादर केले.शेवटी वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगुन नागरिकांनी सजग राहिलं पाहिजे व बुवा–बाबांच्या भुलथापांना बळी पडु नये असे सांगण्यात आले.शिबीरासाठी आयु.अरुण पटेकर,शिवकुमार मस्के आयुनी.विशाखा ठोके,कौशल्या मस्के, महानंदा गायकवाड,कुसुम मस्के,सुनिता कांबळे,लता वाघमारे,नानी मस्के व इतर बौद्ध उपासक–उपासिका,बालक–बालिका यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे शहर सरचिटणीस आयु.जयपाल राहूल मस्के यांनी केले.शेवटी सरणत्त घेवून शिबीराची सांगता करण्यात आली.

# शासनाच्या नियमांना केराची टोपली- प्रा. मकबूल शेख नियमबाह्य सेवा समाप्तीच्या निषेधार्थ शाहू महाविद्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण




लातूर/ प्रतिनिधी: राजर्षी शाहू महाविद्यालयाने नियमबाह्य पद्धतीने सेवा समाप्ती केल्यामुळे प्रा. यशवंत काशिनाथ जोपळे या शिक्षकाने शाहू महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. सेवेत कायम केल्याशिवाय आपण उपोषण मागे घेणार नसल्याचे प्रा. जोपळे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना स्पष्ट केले.या प्रकरणी शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्याचे काम संस्था करत असल्याचे मुपटा संघटनेचे प्रा. मकबूल शेख यांनी सांगितले.

प्रा.जोपळे यांनी सोमवार दि. ३ पासून उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला शिक्षकांच्या मुपटा या संघटनेने जाहीर पाठिंबा दिला आहे. पत्रकारांशी संवाद साधताना संघटनेचे विभागीय अध्यक्ष मकबूल शेख यांनी सांगितले की,३ वर्षांपूर्वी शासनाच्या पवित्र पोर्टलच्या माध्यमातून जोपळे यांची नियुक्ती करण्यात आली होती. ३३ महिन्यांच्या सेवेनंतर शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य महादेव गवारे यांनी त्यांना सेवामुक्त केले. अध्यापनात दोष दाखवत त्यांना सेवामुक्त करण्यात आले.मुळात एखाद्या शिक्षकाला सेवामुक्त करण्यासाठी समिती नेमावी लागते. तशी कुठलीही समिती या प्रकरणात नेमण्यात आलेली नाही. ३३ महिने काम झाल्यानंतर सेवामुक्तीचे पत्र दिले गेले. विशेष म्हणजे प्रा. जोपळे यांच्यासमवेत रुजू झालेल्या इतर पाच जणांना मात्र सेवेत कायम करून घेण्यात आले आहे. याप्रकरणी संबंधित शिक्षक आणि संघटनेने संस्था अध्यक्ष डॉ.गोपाळराव पाटील सचिव अनिरुद्ध जाधव तसेच शिक्षण उपसंचालकांची भेट घेऊन पत्रव्यवहारही केला. शिक्षण उप संचालकांनी त्यांना रुजू करून घेण्याचे पत्र दिले आहे. परंतु संस्थेने त्या पत्राला केराची टोपली दाखवली. काही दिवसांनी संस्था अध्यक्ष व सचिवांनी त्यांना पुन्हा एकदा सेवामुक्त करण्याचे पत्र दिले आहे. शासनाचे नियम पायदळी तुडवत संस्था नियमाबाह्य पद्धतीने वागत आहे. त्यामुळे याप्रकरणी आदिवासी प्राध्यापक यशवंत जोपळे यांना न्याय मिळेपर्यंत संघटना त्यांच्या पाठीशी उभी राहणार असल्याचेही मकबूल शेख यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस आदिवासी संघटनेचे रामराजे अत्राम, उर्दू मुपटा संघटनेचे अफसर सय्यद ,फुरकान उस्मानी, बलभीम सातपुते, शिवशरण हावळे,प्रा.प्रकाश कांबळे, प्रा. बाबासाहेब कांबळे, किशन कांबळे, आसिफ पटेल, मुजम्मील पठाण व पदाधिकाऱ्याची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र अंनिस बीड जिल्हाभर शाखा स्थापन करणार ! अंधश्रध्दा निर्मूलन कार्यात सहभागी व्हा––हनुमंत भोसले

केज/प्रतिनिधी समाजातील अंशश्रद्धा दिवसेंदिवस कमी होण्यापेक्षा वाढत आहे. अध्यात्माच्या व लोकांच्या ईश्वरी श्रद्धेच्या आडून सर्वसामान्यांचे आर्थिक, लैंगिक व मानसिक शोषण करणारी वृत्ती व त्यांच्या टोळ्या मोठ्या संख्येने वाढत असल्याने याला प्रतिबंध करून त्यावर रोक लावण्यासाठी विवेकी व वैज्ञानिक दृष्टिकोन असणाऱ्या युवक–युवती व नागरिकांनी बीड जिल्ह्यात तालुका व सर्कल ठिकाणी स्थापन होणाऱ्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन संघटनेच्या शाखेत सहभागी व्हावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे बीड जिल्हा अध्यक्ष हनुमंत भोसले यांनी केले आहे. सध्या बीड जिल्ह्यात करणी, भानामती, भूतबाधा, चमत्कार अशा काल्पनिक बाबींची भीती दाखवून समाजाचे शोषण करणारे लोक व त्यांच्या समर्थकांची संख्या खूप वाढली आहे. खरे पाहता वरील बाबींची भीती दाखवून लोकांना भ्रमित करणे हा कायद्यानुसार मोठा गुन्हा आहे व त्यासाठी मोठता शिक्षेची तरतूद आहे. मात्र अशा शोषण व्यवस्थेत काम करणारे लोक यासाठी ईश्वर, दैववाद व कर्मकांडाची भीती दाखवून लोकांना आपल्या मनाप्रमाणे वागायला लावतात व त्यामोबदल्यात पैसे, महिलांचे लैंगिक शोषण व मानसिक छळ करून शोषण करतात. हा धंदा सध्या बीड जिल्ह्यात मोठता प्रमाणात फोफावत आहे. असे लोक अध्यात्म व धर्माचा आधार घेत असल्याने त्यांना विरोध करायला किंवा त्यांच्या विरोधात तक्रार करायला लोक पुढे येत नाहीत. यासाठी आता बीड जिल्ह्यातील सर्व तालुके व सर्कलच्या ठिकाणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शाखा स्थापन करण्याचा उपक्रम हाती घेतला असून बहुजन समाजातील सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या व छत्रपती



शिवराय,संत तुकाराम महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगेबाबा यांच्या कार्याला वाहून घेतलेल्या कार्यकर्त्यांनी आपापल्या जवळच्या शाखा कार्यकारिणीत सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र अंनिस चे जिल्हाध्यक्ष हनुमंत भोसले व जिल्हा कार्याध्यक्ष प्रदीप चव्हाण यांनी केले आहे. ज्यांना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत काम करायचे आहे त्यांनी तात्काळ हनुमंत भोसले (९४२३७३३८८८) या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. संविधानातील तरतुदीनुसार अंधश्रद्धा निर्मूलन हे शासकीय धोरण असल्याने या कार्यात कायद्यानुसार शासकीय व निमशासकीय सेवेत असणारे लोक आपल्या राहिलेल्या वेळेत या कार्यात सहभागी होऊ शकतात. हे काम बीड जिल्ह्यात जोमाने व्हावे व बीड जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात अंनिस शाखा कार्यरत असाव्यात असे नरेंद्र दाभोळकरांचे स्वप्न होते. तरी जास्तीत जास्त सामाजिक जाणिव असणाऱ्या नागरिकांनी या कार्यात सहभागी व्हावे असेही जिल्हा समितीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

# प्रेम प्रकरणातून चौघांनी केला विवाहित तरुणाचा खून ! प्रेयसीच्या नातेवाईकांनी जेवायला बोलावून खून करून प्रेत महामार्गावर फेकून दिले !

केज/प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील एका विवाहित तरुणाला प्रेम प्रकरणातून पाहुण्याच्या घरी जेवनाच्या बहाण्याने बोलावून घेवून त्याचा खून करून प्रेत महामार्गावर फेकून दिल्याची खळबळजनक घटना धाराशिव जिल्ह्यात घडली असून खून झालेला तरुण हा बीड जिल्ह्यातील साळेगाव येथील आहे. या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील साळेगाव येथील एक तरुण मुस्तकिन जब्बार शेख हा धाराशिव जिल्ह्यातील मोहा ता. कळंब येथे एका मस्जिदमध्ये धार्मिक शिक्षण देण्याचे काम करीत आहे. मुस्तकिन शेख याचे लग्न झालेले असून त्याला एक मुलगा व मुलगी आहे; परंतु त्याची पत्नी व त्याचे आपसात पटत नसल्याने ते दोघे विभक्त राहत होते. दरम्यान मुस्तकिन शेख याचे पुणे येथे मूळची बीड जिल्ह्यातील पिंपळनेर येथील असलेल्या एका विवाहित महिले सोबत ओळख झाली आणि त्या दोघांचे प्रेमसंबंध जुळले. मात्र त्यांचे हे सबंध त्या महिलेचे वडील आणि भाऊ यांना हे प्रेम सबंध मान्य नव्हते. या बाबत दोघांच्याही घरच्यांनी त्यांना समजावून सांगितले; मात्र त्यांनी त्यांचे ऐकले नाही. दरम्यान मुस्तकिन शेख याने त्याच्या आई–वडिलांना ते दोघे लग्न करणार असल्याचे सांगितले होते. यामुळे त्या महिलेच्या वडिल सरदार शेख व भाऊ अकबर शेख यांनी मुस्तकिन शेख याला जिवे मारण्याची धमकी सुद्धा दिली असल्याचे त्याने त्याच्या वडिलांना सांगितले होते. दिनांक २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ८–३० वा. चे सुमारास मुस्तकीन शेख याने त्याच्या आईला सांगीतले की, तो मौजे गोजवाडा येथे सरदार शेख व अकबर शेख यांनी त्याचे बहीणीचे घरी मेजवाणी आयोजीत केली आहे. मी दोन तासामध्ये परत येतो असे सांगुन फोन ठेवला. त्या नंतर त्या महिलेचा वडील सरदार शेख, भाऊ अकबर शेख, दुसरा भाऊ व त्याचा मेव्हणा या चौघांनी दि. २ फेब्रुवारी रोजी रात्री १२–०० वाजता मुस्तकिन शेख याचा खून करून त्याचे प्रेत हे धाराशिव जिल्ह्यातील वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून जाणाऱ्या महामार्गावर फेकून अपघात घडल्याचा बनाव केला. मयत मुस्तकिन शेख यांच्या खून प्रकरणी त्याचे वडील जब्बार शेख यांच्या तक्रारी वरून दिनांक ३ फेब्रुवारी रोजी वाशी जि. धाराशिव पोलीस ठाण्यात सरदार शेख, त्याचा मुलगा अकबर शेख व दुसरा मुलगा आणि त्यांचा मेव्हणा यांच्या विरुद्ध गु. र. नं. ३९/२०२५ भा. न्या. सं. १०३(१) व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक रमेश घुले हे तपास करीत आहेत.

मुस्तकिन शेख यांचा खून कसा घडला :– दिनांक ३१ जानेवारी रोजी सकाळी १०–०० वा चे सुमारास मुस्तकीम यांने त्याचे वडील जब्बार शेख यांना फोन वरून सांगीतले की, त्याचे प्रेम असलेल्या महिलेचा भाऊ अकबर शेख व त्याचा मित्र असे त्याला भेटण्यासाठी मोहा ता. कळंब येथे येणार आहेत. त्या नंतर त्याच दिवशी दुपारी ४–०० वा. मुस्तकीन शेख



हा त्याचे सोबत अकबर शेख व अकबरचा यांचा मित्र हे दोघे साळेगांव येथे आले आणि उद्या त्या महिलेचे वडील व भाऊ हे त्यांना सोयरिकिसाठी भेटायला येतो असे म्हणून निघून गेले. दिनांक १ फेब्रुवारी रोजी सकाळी १०–०० वाजता सरदार शेख, त्या महीलेचा भाऊ व तिच्या बहीणाचा नवरा असे साळेगांव येथे आले. त्यावेळी त्यांनी मुस्तकिन शेख यांच्या आईला सांगितले की, तुमच्या पोराला समजून सांगा अन्यथा काय होईल ते सांगता येत नाही ! असे म्हणून धमकी देवून गेले. दिनांक २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ८–३० वा. चे सुमारास मुस्तकीन शेख याने त्याच्या आईला सांगीतले की, तो मौजे गोजवाडा येथे सरदार शेख व अकबर शेख यांनी त्याचे बहीणीचे घरी मेजवाणी आयोजीत केली आहे. मी २ तासामध्ये परत येतो असे सांगुन फोन ठेवला. दिनांक २ फेब्रुवारी रोजी रात्री १२:०० वाजता मुस्तकिन शेख याचे प्रेत हे धाराशिव जिल्ह्यातील वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून जाणाऱ्या महामार्गावर आढळून आल्याची माहिती त्याच्या आई वडिलांना मिळाली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE